बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २८ सप्टेंबर २०२३**

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६९१/२०२३ भादवि २७९,३०४(अ),३३७,३३८, मोवाकाक १३४(ब)/१८४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २०/०९/२०२३ रोजी २३.१५ वा चे सुमारास, कोंडा नगर, जुना अक्कलकोट नाका ब्रिजवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २७/०९/२०२३ रोजी २२.२२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुर्यकांत बसवण्णा सद्दलगी, वय- ४० वर्षे, रा. १५१/७, मु.पो. वळसंग, जैन मंदिर समोर, ता. द. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | ट्रक क्रं. एम एच ४५ ए एस ७३२३ चा अज्ञात चालक नाव पत्ता माहित नाही |
| **मयताचे नाव** | : | चंद्रकांत बसवण्णा सद्दलगी, वय- २८ वर्षे, रा. १५१/७, मु.पो. वळसंग, जैन मंदिर समोर, ता. द. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा भाऊ चंद्रकांत हा कामावरुन घरी जात असताना वरील ठिकाणी आले असता, वळसंग कडे जाणारा वरील आरोपीत ट्रक चालक याने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने, हयगयीने चालवुन कोणतीही काळजी न घ्होता भरधाव वेगाने ट्रक अचानक रिव्हर्स मागे घेवून फिर्यादीचा भाऊ याचे मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी डब्ल्यु १३४९ बजाज प्लॅटीना या गाडीला जोराची धडक देवून, फिर्यादीचे भावाच्या डोक्याला गंभीर दुखापत करुन त्याच्या मृत्युस कारणीभुत ठरला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५१२ गायकवाड- ९६२३३१०२२२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४९५/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २३/०५/२०२३ ते दि. १४/०७/२०२३ रोजी पर्यंत चे दरम्या, फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २७/०९/२०२३ रोजी २२.५० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | निशा किरण रणधरे, वय- २१ वर्षे, रा. २/८३, मड्डी वस्ती, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) किरण शिवानंद रणधरे- पती, २) गौराबाई रणधरे- सासु, ३) संदिप रणधरे- दिर, ४) संतोष रणधरे- दिर, सर्व रा. मु.पो.धोत्री, ता. द. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की वरील वेळी व ठिकाणी यातील वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस लग्नात मानपान नीट केला नाही. हुंडा दिला नाही, तु काळी आहे. आमच्या मुलाला शेभत नाही तरी देखील आम्ही तुला या सोबत लग्न केले आहे. मड्डी वस्ती मधल्या मुली चांगल्या नाहीत तु आमचे पदरात कशी काय पडली, तु पांढऱ्या पायाची आहे. असे टोचून बोलुन अपमानीत करुन लग्नात उरलेले अर्धा तोळे सोने दिले नाही. म्हणून फिर्यादीस शारिरीक व मानसिक त्रास देवून शिवीगाळ दमदाटी करुन मारहाण केली असल्याने तसेच फिर्यादीस माहेरुन दोन लाख रुपये घेवून ये त्याशिवाय तुला नांदवुन घेणार नाही अशी दमदाटी करुन हाकलुन दिले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५५७ गायकवाड- |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ६५७/२०२३ भादवि ४०६,४२०,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. ०१/०६/२०२२ रोजी ते आजतागायत, सात रस्ता, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २७/०९/२०२३ रोजी १७.१२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | शिवकुमार बसवराज सुरपुर, वय- ५९ वर्षे, रा. ७३७, वार्ड नं.१३, विदया नगर, सिंदगी रोड, इंडी, ता. इंडी, जि. विजापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अनिल बसवराज गवसाने, रा. जुळे सोलापूर, २) स्वाती सुर्यकांत घाडगे, रा. सात रस्ता, सोलापूर |
| **फसवणुक र** | **:** | १,६५,०००/- रुपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की वरील वेळी व ठिकाणी यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करुन फिर्यादीचे मडुर कॉम्प्लेक्स, न्यु पाच्छा पेठ सोलापूर येथील गाळयावरती कर्ज प्रकरण मंजुर करुन देतो असे खोटे आश्वासन देवून, फिर्यादी कडुन वेळोवेळी १,६५,०००/- रुपये घेवून फिर्यादीस कर्ज प्रकरण मंजुर न करता फिर्यादीस शिवीगाळ व दमदाटी करुन खोटया गुन्हयात आडकविण्याची धमकी देवून फिर्यादीची आर्थीक फसवणुक केली आहे म्हणून. तपास:- सपोनि- कुलकर्णी - **९७६५९००१००** |